महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्रमांकः कअप १२१८/प्र.क्र.१०३/१४ब
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०८ मे, २०१९

आदेश

सन २०१८-२०१९ या निवडसूची वर्षात मंत्रालयीन विभागातील खालील सहायक कक्ष अधिकारी (गट (ब) अराजपत्रित- वेतनश्रेणी रु.९३००-३४८००- ग्रेड पे रु. ४३००) यांना कक्ष अधिकारी (गट(ब) राजपत्रित- वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० -ग्रेड पे रु. ४८००) पदावर या आदेशाद्वारे विहित अटीच्या अधीनतेने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच सदर सहायक कक्ष अधिकारी यांची पदोन्नतीअंती त्यांच्या नावासमोर स्तंभ-६ मध्ये दर्शविण्यात आलेल्या विभागामध्ये पदस्थापना करण्यात येत आहे.

अ. क्र.	श्री/ श्रीमती	नाव	प्रवर्ग	सध्याचा विभाग	पदोन्नतीनंतरचा विभाग
१	२	३	४	५	६
१)	श्री	प्रे.ज्ञा.सोनटक्के	अजा	सार्वजनिक आरोग्य विभाग	वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
२)	श्री	र.पुं.इंगोले	अजा	नगर विकास विभाग	नगर विकास विभाग
३)	श्रीमती	व.भ.जाधव	खुला	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग	मृद व जलसंधारण विभाग
४)	श्रीमती	अ.अ.लेंभे	विमाप्र	गृहनिर्माण विभाग	गृहनिर्माण विभाग
५)	श्री	प्र.गु.पवार	अज	उच्च व तंत्रशिक्षण विभाग	वित्त विभाग
६)	श्री	प्र.रा.होळकर	भज-क	गृह विभाग	गृह विभाग
७)	श्री	अ.ब.शितोळे	खुला	गृह विभाग	नगर विकास विभाग
८)	श्रीमती	नि. रा. गोलम	खुला	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग	सामान्य प्रशासन विभाग
९)	श्री	शै.शं.खाडे	खुला	विधि व न्याय विभाग	सार्वजनिक आरोग्य विभाग
१०)	श्री	रा.डी.धाडणकर	इमाव	कृषि व पदुम विभाग	मृद व जलसंधारण विभाग
११)	श्रीमती	दि.म.शाहारे (कोचे)	अजा	विधि व न्याय विभाग	विधि व न्याय विभाग
१२)	श्री	कि.दौ.पाटील	खुला	गृह विभाग	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
१३)	श्री	सं.प्र.कदम	खुला	महसुल व वन विभाग	महसुल व वन विभाग
१४)	श्री	अ.ल.म.सौदागर	खुला	सार्वजनिक बांधकाम विभाग	सार्वजनिक बांधकाम विभाग
१५)	श्री	म.ह.कानडे	खुला	सार्वजनिक आरोग्य विभाग	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
१६)	श्री	सु.म.जाधव	खुला	महसुल व वन विभाग	महसुल व वन विभाग

अ. क्र.	श्री/ श्रीमती	नाव	प्रवर्ग	सध्याचा विभाग	पदोन्नतीनंतरचा विभाग
१७)	श्री	सु.म.सकपाळ	खुला	उच्च व तंत्रशिक्षण विभाग	कृषि व पदुम विभाग
१८)	श्री	प्र.म.तवटे	खुला	विजा भज इमाव व विमाप्र कल्याण विभाग	वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
१९)	श्री.	वि.मो.वाघमारे	अजा	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
२०)	श्रीमती	व.सं.भगत (नरांजे)	अजा	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग	जलसंपदा विभाग
२१)	श्रीमती	अ.वि.जगताप	अजा	आदिवासी विकास विभाग	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
२२)	श्रीमती	स्वा.सु.लोहार	भज(ब)	वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग	वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
२३)	श्रीमती	क.वि.पवार	खुला	जलसंपदा विभाग	उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
२४)	श्री	म.ना.माणगांवकर	खुला	सामान्य प्रशासन विभाग	सामान्य प्रशासन विभाग
२५)	श्री	वि.वा.कदम	खुला	सार्वजनिक बांधकाम विभाग	सामान्य प्रशासन विभाग
२६)	श्रीमती	सं.अे.चंडकी	खुला	जलसंपदा विभाग	जलसंपदा विभाग
२७)	श्री	श.गो.गायतोंडे	खुला	वित्त विभाग	वित्त विभाग
२८)	श्री	द.छ.शिंदे	अजा	गृह विभाग	शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
२९)	श्रीमती	ख.फा.नाईकवाडे	खुला	जलसंपदा विभाग	महिला व बाल विकास विभाग
३०)	श्रीमती	प.न.काटीकर	खुला	महिला व बाल विकास विभाग	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
३१)	श्री	अ.नं.भंडारी	खुला	सामान्य प्रशासन विभाग	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
३२)	श्रीमती	सं.अ.टांकसाळे	खुला	सामान्य प्रशासन विभाग	सामान्य प्रशासन विभाग
३३)	श्री	भा.मु.मोटघरे	अजा	गृह विभाग	महसुल व वन विभाग
३४)	श्रीमती	क.वि.कुलकर्णी	खुला	सामान्य प्रशासन विभाग	सामान्य प्रशासन विभाग
३५)	श्रीमती	न.नि.सावंत	खुला	जलसंपदा विभाग	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
३६)	श्री	रा.सु.सोनावणे	अजा	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
३७)	श्री	स.का.हडपे	भज(क)	मृद व जलसंधारण विभाग	सार्वजनिक बांधकाम विभाग
३८)	श्री	रा.स.मांजरेकर	खुला	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
३९)	श्रीमती	स.दि.वंजारे	खुला	नियोजन विभाग	नियोजन विभाग

अ. क्र.	श्री/ श्रीमती	नाव	प्रवर्ग	सध्याचा विभाग	पदोन्नतीनंतरचा विभाग
४०)	श्रीमती	अ.बु.तेलंग	अजा	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग (प्रतिनियुक्ती सांस्कृ. कार्य संचा. नागपुर)	** प्रपत्र बढती सांस्कृतिक कार्य संचालनालय, नागपूर
४१)	श्रीमती	मं.द.सोनजे (कोठावदे)	खुला	नगर विकास विभाग	महसुल व वन विभाग
४२)	श्री	वि.प्र.सांगळे	भज(ड)	वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग	जलसंपदा विभाग
४३)	श्रीमती	का.मो.पाटील	इमाव	सामान्य प्रशासन विभाग	उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
४४)	श्रीमती	वृ.सु.काळे	खुला	नियोजन विभाग	नियोजन विभाग
४५)	श्रीमती	रु.रं.पिंपळे	भज(ड)	सामान्य प्रशासन विभाग	कृषि व पदुम विभाग

(** महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम-४०, परिशिष्ट -२, अट क्र.१८ नुसार प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या श्रीमती अ.बु.तेलंग, सहायक कक्ष अधिकारी यांना आदेशाच्या दिनांकापासून तदर्थ स्वरुपात प्रतिनियुक्तीच्या कार्यालयात प्रपत्र बढती (पदोन्नती) देण्यात येत आहे. उपरोक्त तरतुदीनूसार प्रपत्र बढतीचा कालावधी या आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांनी समाप्त होईल. त्यानंतर श्रीमती तेलंग यांनी मंत्रालयीन विभागात कक्ष अधिकारी पदावर रुजू व्हावे.)

२. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दि.२८.१२.२०१७ रोजी दिले आहेत. त्यानुसार तूर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवाज्येष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/ कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दि.२५.०५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी अशा सूचना सा.प्र.वि./का.१६-ब ने दि.२९.१२.२०१७ च्या पत्रान्वये दिल्या आहेत. त्यानुसार मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून तसेच पुढील अटीच्या अधीन राहून संबंधित सहायक कक्ष अधिकारी यांना कक्ष अधिकारी संवर्गात खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे:-

१) **सदरची पदोन्नती ही प्रशासकीय निकड म्हणून तात्पुरत्या स्वरुपातील तदर्थ पदोन्नती राहील.**

२) सदर पदोन्नत्या, सद्य:स्थितीत सहायक कक्ष अधिकारी या पदाच्या ज्येष्ठता यादीबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नाही, तसेच या ज्येष्ठता यादीस आव्हानित देखील करण्यात आलेले नाही ही वस्तुस्थिती विचारात घेऊन केवळ तात्पुरत्या/तदर्थ स्वरुपात देण्यात येत आहेत.

३) सरळसेवा कोटयातील रिक्त पदांवर दिलेली तदर्थ पदोन्नती ही ११ महिने अथवा प्रतिनियुक्तीवर गेलेले उमेदवार परत येतील अथवा आयोग पुरस्कृत उमेदवार उपलब्ध होतील यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहील. दरम्यानच्या काळात आयोग पुरस्कृत उमेदवार प्राप्त झाल्यास किंवा प्रपत्र बढतीने कार्यरत पदोन्नत अधिकाऱ्यांचा प्रपत्र बढतीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर तो मंत्रालयीन विभागात रुजू झाल्यास किंवा प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ कक्ष अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यास त्यांच्यासाठी कक्ष अधिकारी संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास निवडसूचीतील कनिष्ठतम अधिकाऱ्यास पदावनत करण्यात येईल.

४) **सदर तदर्थ पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात असून सदर पदावर संबंधित अधिकाऱ्यांचा कायमस्वरुपी धारणाधिकार राहणार नाही.**

५) मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ०६.०८.२०१८ रोजीच्या निर्णयानुसार सद्य:स्थितीत कक्ष अधिकारी संवर्गाच्या दिनांक ०१.०१.१९८६ पासूनच्या ज्येष्ठता याद्या सुधारित करण्याची कार्यवाही सुरु आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ज्येष्ठता याद्या सुधारित करतांना अभावित ठरणारे अधिकारी खालच्या संवर्गात पदावनत (Push down) होऊ शकतात व त्याचा परिणाम सर्व संवर्गावर होऊ शकतो अशी संभाव्यता आहे. सदर कार्यवाहीचा आता प्रस्तावित असलेल्या कक्ष अधिकारी संवर्गातील तदर्थ पदोन्नतीसाठी थेट संबध येत नाही. परंतु भविष्यात काही अधिकारी पदावनत होण्याची संभाव्यता विचारात घेता कायदेशीर बाबी उद्भवू नयेत तसेच अधिकची दक्षता म्हणून प्रस्तुत कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नतीचे आदेश हे मा.सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका क्र.२५१८१/२०१८ च्या अधीन राहतील.

६) सन २०१८-१९ या निवडसूची वर्षाकरिता पात्र सहायक कक्ष अधिकारी यांची निवडसूची तदर्थ स्वरुपाची असून कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नत्या ह्या तात्पुरत्या स्वरुपाच्या आहेत. **परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमित पदाचा व सेवा ज्येष्ठतेचा कोणतेही हक्क मिळणार नाही.**

७) निवडसूचीतील सर्व अधिकाऱ्यांनी दिनांक २५.०१.१९९९ अन्वये विहित केलेले महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम, १९९९ व दिनांक २८.०५.२०१८ अन्वये विहित केलेले (सुधारणा) नियम, २०१८ नुसार संगणक परीक्षा उत्तीर्ण केली आहे याची संबंधित विभागाने खातरजमा करावी.

८) सदर पदोन्नत्या या मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ८६२/२०१६ च्या अधीन राहतील.

९) सदर पदोन्नत्या तदर्थ स्वरुपाच्या असून त्या केवळ पदोन्नत कोटयात उपलब्ध होणाऱ्या पदांनुसार नियमित करण्यात येतील

१०) संबंधित सहायक कक्ष अधिकारी यांची कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

११) संबंधित सहायक कक्ष अधिकारी यांनी कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती न स्विकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.३०३/ का.१२, दिनांक १२.०९.२०१६ अन्वये त्यांचे नांव सन २०१८-१९ च्या निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल व पुढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसूच्यांमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीत कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नतीसाठी त्यांची पात्रता तपासण्यात येईल.

१२) सदर अधिकाऱ्यांची कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती ही सदर अधिकाऱ्यांविरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही वा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे. संबंधित विभागाने याची खातरजमा करावी.

१३) मागास प्रवर्गातील अधिकाऱ्यांची पदोन्नती ही शासन निर्णय दिनांक २५.०५.२००४ मधील तरतूदीनुसार त्यांना आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत तसेच सदर अधिकाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित जातपडताळणी समितीने निर्गमित केले आहे या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. संबंधित विभागाने याची खातरजमा करावी.

१४) हे आदेश तत्काळ अंमलात येतील. पदोन्नत झालेल्या अधिकाऱ्याला संबंधित विभागाने तत्काळ कार्यमुक्त करावे. तसेच पदोन्नत अधिकाऱ्याने पदस्थापना केलेल्या विभागात तत्काळ रूजू व्हावे. संबंधित विभागांनी कार्यमुक्ततेचे तसेच रुजू करुन घेतल्याच्या आदेशाच्या प्रती या विभागास पाठवाव्यात.

३. दरम्यान, पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत राज्य शासनाने दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ व इतर राज्यांच्या याचिकेबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १५.०४.२०१९ रोजी पुढील प्रमाणे आदेश पारित केले आहेत."*Until further orders status quo, as it exists today, shall be maintained."* याबाबत कार्यासन १६-ब यांनी पुढील प्रमाणे अभिप्राय दिले आहेत. *"दिनांक १५.०४.२०१९ रोजी व आताही या कार्यासनाच्या दिनांक २९.१२.२०१७ च्या पत्रातील सूचना अस्तित्वात आहेत. सबब, पुढील आदेश होईपर्यंत सर्व पदोन्नत्यांबाबत या कार्यासनाच्या दिनांक २९.१२.२०१७ च्या पत्रातील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी."* सबब, सदर आदेशातील पदोन्नत्या शासन पत्र दिनांक २९.१२.२०१७ मधील सूचनांनुसार केवळ तात्पुरत्या स्वरुपात व कार्यासन १६-ब यांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायानुसार देण्यात येत आहेत.

४. महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणातील तरतूदीनुसार पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण घेणे संबंधित पदोन्नत अधिकाऱ्यांवर बंधनकारक राहील अन्यथा संबंधित कक्ष अधिकाऱ्यास सहायक कक्ष अधिकारी पदावर पदावनत करण्यात येईल.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५०८१२४१२२९००७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.05.08 12:45:31 +05'30'

(ग. भि. गुरव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संबंधित सहायक कक्ष अधिकारी (संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)

प्रत,

१) अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, सर्व संबंधित मंत्रालयीन विभाग. (संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)

२) सह सचिव/उप सचिव (आस्थापना), सर्व संबंधित मंत्रालयीन विभाग.

३) कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन.क्र.१४,१४-अ

४) निवडनस्ती, कार्यासन क्र.१४-ब /संग्रहार्थ.